2016-17

# Govt. Vidharbha Institute of Science & Humanities, Amravati

One Day

Interdisciplinary National Seminar

on

**" VARIOUS ASPECTS OF DR. BABASAHEB AMBEDKAR'S WORK "**

3rd December 2016

**Organizer** - Dr. Babasaheb Ambedkar 125th Anniversary Committee & Department of History, G.V.I.S.H., Amravati.

## CERTIFICATE

This is to certify that Prof./ Dr. /Mr./Ms. Ravi R. Gawande

of Y.D.V.D. Arts & Commerce College, Teosa Dist. Amravati.

has participated in Interdisciplinary National Seminar on 3rd December 2016. He/She presented a paper on डॉ. आंबेडकर - एक अर्थतज्ञ.

Dr. B. R. Maske
Convener

Assoc. Prof. J. D. Patil Sangludkar Mahavidyalaya, Daryapur
Sheela Umale (Chaple)
HOD, History & Co-Ordinator

Dr. Sangita Yawle
Director, G.V.I.S.H., Amravati

# Govt. Vidharbha Institute of Science & Humanities Amravati

## One Day Interdisciplinary National Seminar

## 3rd December 2016



# VARIOUS ASPECTS OF DR. BABASAHEB AMBEDKAR'S WORK

*Editors -*
Dr. Sheela Umale
Dr. B. R. Maske
Dr. G. S. Mahadik
Dr. N. K. Tembhekar
Prof. H. D. Dalavi
Dr. Vinod Gawande
Dr. Vaishali Deshmukh

**PROCEEDING**

ISBN-978-93-84021-53-5

*Organized By*
Dr. Babasaheb Ambedkar 125th Anniversary Committee & Department of History, G.V.I.S.H., Amravati.

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार<br>*प्रा. डॉ. महादेव आसाराम रिठे* | 66 |
| 32 | महिला सुरक्षिततेबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>*डॉ. वैशाली एल देशमुख/डॉ. जयश्री एस. पाटील* | 68 |
| 33 | अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>*प्राचार्य डॉ. व्हि. एच. नागरे* | 70 |
| 34 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार<br>*डॉ. सुनंदा गडकर* | 73 |
| 35 | स्त्री उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>*प्रा. पी. ए. टाले* | 75 |
| 36 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सुसंस्कृत नेता<br>*प्रा. डॉ. विकास कदम /डॉ. बाळकृष्ण माळी* | 77 |
| 37 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री-विषयक विचार - मानसशास्त्रीय दृष्टीकोन<br>*कु. सोनाली खांडेकर* | 79 |
| 38 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याच्या पैलू / डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेतील 'समता'<br>*सुदर्शन सुधाकर नरवाडे* | 82 |
| 39 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व वि. रा. शिंदे यांचे बुध्द विचारातील समन्वय<br>*प्रा. ए. एम. काळबांडे* | 84 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री-भान जागृतीची प्रेरणा : काही नोंदी<br>*प्रा. डॉ. शोभा इं. रोकडे* | 86 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीकोनातून कृषी व्यवस्थापन<br>*प्रा. डॉ. ठकसेन दा. राजगुरे* | 88 |
| 42 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक चिंतन<br>*प्रा. अनुप अरुण नांदगांवकर* | 91 |
| 43 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री सबलीकरण विषयक विचार<br>*डॉ. प्रियदर्शनी व. देशमुख* | 93 |
| 44 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक अर्थशास्त्र<br>*प्रा. गजानन य. वानखडे* | 95 |
| 45 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>*प्रा. इंगोले आर. चे.* | 97 |
| 46 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार<br>*प्रविण नाजूकराव वानखडे* | 100 |
| 47 | डॉ. आंबेडकर- एक अर्थतज्ञ<br>*प्रा. रवि आर. गावंडे* | 102 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बुद्धधर्म विषयक विचार<br>*डॉ. एन.व्ही. चरवड / डॉ. एस. एस. खंडार* | 104 |
| 49 | हिन्दु कोड बिल : इतिहास व गरज<br>*श्री. राजेश वामनराव श्रीखंडे* | 105 |
| 50 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांसाठी योगदान<br>*कु. वैशाली संजय शेंटे* | 107 |
| 51 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवादातील आर्थिक विचार<br>*प्रा. विवेश भारत निकते* | 109 |
| 52 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतीविषयक विचारांची व्यावहारीक उपयोगिता<br>*श्रीमती स्मिता गोविंदराव वैतुले* | 111 |
| 53 | गोलमेज परिषद व पुणे करारः वास्तव<br>*डॉ. प्रमोद चव्हाण* | 114 |




Scanned by CamScanner

# डॉ. आंबेडकर- एक अर्थतज्ञ

प्रा. रवि आर. गावंडे
या.द.व.देशमुख, कला वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा जन्म अशा काळात झाला ज्या काळात भारतामध्ये ब्रिटीशांचे सरकार होते. तसेच उच्च वर्णिय लोकांच्या मागासलेल्या विचारांच्या दबावाखाली दबलेल्या समाजात त्यांचा जन्म अस्पृष्य समजल्या गेलेल्या जातीत १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. ज्या जातीला समाजात कोणत्याच प्रकारचे अस्तित्व नव्हते तसेच कोणत्याच प्रकाराचा सामाजिक अधिकार उच्च वर्णिय समाजाने दिलेला नव्हता तरी या परिस्थीतीवर मात करुन जगाच्या वेगवेगळ्या देशात जावून शिक्षणातल्या उच्चातल्या उच्च अशा पदव्या घेवुन आपला आणि देशाचा गौरव वाढविला. बाबासाहेबांचे नाव भारताच्या किर्तीवंत व बुध्दीवंत लोकांमध्ये अग्रस्थानी असून देशाच्या सामाजीक व राजकीय क्षितीजावर त्यांचा उदय १९२० नंतर झाला. बाबासाहेबांनी अस्पृष्य म्हणून नाकारल्या गेलेल्या समाजाच्या उध्दारासाठी समाजीक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक घटकांमध्ये मोठ्या प्रमाणावर परिणाम घडून आणलेत. देशातील अस्पृष्य समाजाला तसेच आर्थिक दुर्बल घटकाला एकत्र करुन संघटीत केले. सामाजिक ध्येयापर्यंत जाण्याच्या दृष्टीने राजकीय मार्ग कसा अवलंबवायचा याविषयी त्यांनी समाजाला मार्गदर्शन केले.

कोलंबिया या विद्यापीठातून १९१७ मध्ये त्यांनी अर्थशास्त्र या विषयात पी.एच.डी केली. तसेच लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिस मधून डॉटर ऑफ सायन्सची पदवी व लंडन मधील ग्रेज इनची बॅर ॲट लॉ १९२३ अशा उच्च दर्जाच्या पदव्या त्यांनी संपादीत करुन स्वतःचा तसेच देशाचा गौरव वाढविला. तसेच दलित समाजातील विद्याथ्र्याने त्या काळात अशा प्रतिष्ठेच्या पदव्या मिळविणे ही अतिशय महत्वाची गोष्ट होती.

डॉ. बाबासाहेव आंबेडकर यांच्या अभ्यासाचा विषय हा अर्थशास्त्र असून अर्थशास्त्र या विषयावर त्यांनी विपूल प्रमाणात लिखाण केले. तसेच अर्थशास्त्राच्या माध्यमातून आपले विचार मांडण्याचा प्रयत्न केला. १) ॲडमिनीस्ट्रेशन ॲन्ड फायनांन्स ऑफ दी इस्ट इंडिया कंपनी. २) दि इव्होलेशन ऑफ प्रोव्हिशन फायनान्स इन द ब्रिटीश इंडिया, ३) दि प्रॉब्लेम ऑफ द रुपी : इटस ओरीजीएन ॲन्ड इट्स सोल्युशन इत्यादी पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी भारतीय अर्थशास्त्राविषयी आपले विचार मांडले. यातील पहिल्या दोन पुस्तकातून सार्वजनीक वित्त या व्यवस्थेवर विचार व्यत केले. पहिल्या पुस्तकामध्ये इस्ट इंडिया कंपनीच्याँ १७९२ ते १८५८ या दरम्यानच्या आर्थिक व्यवहारावर त्यांनी प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. तसेच दुसऱ्या पुस्तकामध्ये ब्रिटीश सरकारच्या वसाहतीतील केंद्र व राज्य यांच्या आर्थिक घडामोडीवर प्रकाश टाकण्याचा बाबासाहेबांनी प्रयत्न केला. याचा कार्यकाल १८३३ ते १९२१ असा आहे. तर तिसऱ्या पुस्तकात चलन या विषयावर भाष्य केले. यामध्ये १८०० ते १८९३ या काळातील विनीमयाचे माध्यम म्हणून भारतीय चलनाचा कशा प्रकारे विकास झाला याविषयी यापुस्तकामध्ये सखोल चर्चा करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या ग्रंथाच्या माध्यमातून असे सांगितले की, भारतीय चलनाला जगामध्ये अस्तित्व प्राप्त व्हावे तसेच १९२० च्या काळात चलनाच्या मार्गात येणाऱ्या अडथळ्याविषयी चर्चा करण्यात आली.

मुंबई प्रांताच्या सरकारचे सदस्य असतांना १९२६ मध्ये ग्रामीण भागातील गरीबांच्या समास्याविषयीचे त्यांचे समग्र आकलन त्यांनी उभारलेल्या जनआंदोलनामध्ये प्रतिबींबीत होते. शेतीमधील खोती पध्दती विरुध्द त्यांनी केलेल्या यशस्वी आंदोलनामध्ये ग्रामीण गरीबांची आर्थिक शोषणातून मृतता झाली. महारवतन या नावाखाली सुरु असलेल्या गुलामगीरी विरुध्द त्यांनी आवाज उठविला. यामुळे ग्रामीण भागातील गरीब लोकांचा एक मोठा घटक जमीनदारांच्या तसेच प्रस्थापितांच्या शोषणनातून मुत झाला. सावकार व जमीनदार यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी त्यांनी प्रांतिय सरकारमध्ये विधेयक पास करुन घेतले. तसेच औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या हकासाठी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करुन त्यांच्या शोषणाला वाचा फोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात संघर्ष केला. तसेच १९३५ साली भारतीय रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे अर्थशास्त्रातील असलेल्या सखोल ज्ञानाचा ब्रिटीश सरकारने पुर्णपणे फायदा घेवून भारतीयांच्या आर्थिक व्यवहारासाठी रिझर्व्ह बँकेची भारतात स्थापना केली. तसेच १९४२ ते १९४६ या काळात व्हाईसराय कौन्सीलचे कामगारांचे सदस्य म्हणून कामगारांच्या दैनंदिन व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या. तसेच सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली. बाबासाहेबांनी गोरगरीबांच्या कल्याणासाठी देशात अनेक महत्वपूर्ण पदे सांभाळून ज्यातून या वर्गाचा विकास घडून येईल जेणे करुन त्यांच्या आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारेल या भुमिकेतून महत्वपूर्ण कार्य केले. तसेच भारतामध्ये नद्यांची जोडणी व्हावी जेणे करुन भारतातील शेती ओलीताखाली येईल पर्यायाने भारतीय शेतकरी धनधान्याने समृध्द



Scanned by CamScanner

होईल हा दुरदृष्टीकोन समोर ठेवून भारतामध्ये नद्याजोड प्रकल्प राबविण्याचा सरकारला सल्ला दिला.

बाबासाहेबांच्या मते जातीव्यवस्था आणि अस्पृष्यता यासारख्या समाजीक आजाराचे आर्थिक पैलू उलगडून दाखविण्यासाठी त्यांनी महत्वपूर्ण कार्य केले. महात्मा गांधी श्रमाच्या विभागणी तत्वानुसार जातीव्यवस्था अस्थित्वात राहावी असे मत मांडले होते पण बाबासाहेबांनी जातींचे विध्वंसन या ग्रंथातून महात्मा गांधीच्या विचारावर जोरदार टिका केली. त्यांनी असे लक्षात आणून दिले की, जाती व्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी केली गेली नसून श्रमीकांचीच विभागणी केली गेली आहे हे पटवून दिले. त्यांनी उच्च वर्णियांच्या वर्चस्वाला आवाहन दिले नाही, तर आर्थिक विकासाला अडथळा निर्माण करणाऱ्या घटकाला विरोध केला. जातीव्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशिलता कमी झाली असून त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकुल परिणाम झाला आहे असे त्यांनी आपल्या पुस्तकाच्या माध्यमातून समाजासमोर विचार मांडण्याचा प्रयत्न केला.

तसेच १९४७ मंध्ये स्टेट अँन्ड मायनॉरिटीज नावाने ब्रिटीश सरकारला सादर केलेल्या अहवालामध्ये भारताच्या आर्थिक विकासाची योग्य ध्येय धोरणे कोणती हे समजावून सांगितले होते. जास्त उत्पादन करुन लोकांच्या आर्थिक जिवनाचे नियोजन करणे तसेच खाजगी उत्पादकांना कोणत्याही प्रकारची सवलत न देता संपत्तीचे समान वाटप करता येतील अशा रितीने आर्थिक नियोजन करणे हे सरकारचे कर्तव्य आहे असे त्या अहवालात नमूद करण्यात आले होते.

यावरुन आपल्या लक्षात असे येते की, बाबासाहेबांनी भारताच्या आर्थिक जडणघडण विषयी सखोल अभ्यास करून भारतीय अर्थव्यवस्था कशाप्रकारे विकसित होईल याविषयी आपले विचार व्यत केले.

**संदर्भ :**


१. द प्रॉब्लेम ऑफ द रुपीज – सम्यक प्रकाशन,

२. अनहिलेशन ऑफ कास्ट – नवयाना पब्लीकेशन

३. बी.आर. आंबेडकर : ए बायोग्राफी , पीजन बुक पब्लीकेशन

४. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर , पॉप्युलर प्रकाशन

५. आंबेडकर आणि मार्कस् : सुगावा प्रकाशन, पुणे १९८५

६. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान : डॉ. नरेंद्र जाधव , सुगावा प्रकाशन पुणे , १९९२

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जल नियोजन व विद्युत विकास , सुखदेव थोरात, सुगावा प्रकाशन, पुणे २००५


□□□